विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# सरकारने कांद्यावरील २० टक्के निर्यात शुल्क हटवले

## शेतकऱ्यांना दिलासा

**नवी दिल्ली -** कांदा उत्पादक शेतकऱ्यांना केंद्र सरकारने दिलासा दिला आहे. कांद्यावरील २० टक्के निर्यात शुल्क सरकारने हटवले आहे. १ एप्रिल पासून निर्यात शुल्क शून्य टक्के होणार आहे. या निर्णयामुळे कांदा निर्यात करण्यासाठी प्रोत्साहन मिळणार आहे. गेल्या काही दिवसांपासून कांद्याचे भाव सातत्याने घसरत असल्यानं शेतकऱ्यांमध्ये नाराजी व्यक्त होत होती. उन्हाळी कांदा बाजारात येणार असल्याने येत्या काळात आणखी भाव खाली जाण्याची भीती व्यक्त होत होती.

दरम्यान, गेल्या अनेक दिवसांपासून कांद्यावरील निर्यात शुल्क हटवावे अशी मागणी केली जात होती. निर्यात शुल्क लावल्यामुळं कांद्याच्या दरावर परिणाम होत होता. याचा फटका शेतकऱ्यांना बसत होता. अखेर आज केंद्र सरकारनं कांद्याच्या निर्यातीवरील २० टक्के निर्यात शुल्क हटवण्याचा निर्णय घेतला आहे. याचा राज्यासह देशातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना फायदा मिळणार आहे. दरम्यान, सरकारनं घेतलेल्या या निर्णयाचे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आभार मानले आहेत.

केंद्र सरकारने कांद्यावरील २० टक्के निर्यात कर संपूर्णतः मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे. १ एप्रिल २०२५ पासून या निर्णयाची अंमलबजावणी होईल असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. लासलगाव आणि पिंपळगाव येथून मोठ्या प्रमाणात कांद्याची आवक होत आहे. या निर्णयामुळं महाराष्ट्रातील कांदा उत्पादकांना मोठा दिलासा मिळणार आहे. हा अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेत महाराष्ट्रातील कांदा उत्पादकांना मोठा दिलासा दिल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदीजी आणि



केंद्रीय गृहमंत्री अमितभाई शाह यांचा अत्यंत आभारी असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

महाराष्ट्रातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी मोठा दिलासा देणारा निर्णय केंद्र सरकारने घेतला असून, कांदा निर्यातीवरील वीस टक्के निर्यात शुल्क दिनांक १ एप्रिल २०२५ पासून रद्द करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. त्याची अधिसूचना जारी करण्यात आली आहे. यामुळे राज्यातील लाखो कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या निर्णयाचे स्वागत करत पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री तथा सहकार मंत्री अमित शाह, केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान, केंद्रीय वाणिज्य मंत्री पियूष गोयल यांच्यासह संपूर्ण केंद्रीय मंत्रिमंडळाचे मनः पूर्वक आभार मानले आहेत. केंद्र सरकारचा हा निर्णय राज्यातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. कांदा निर्यातीवर आकारण्यात येणारा वीस टक्के निर्यात शुल्क रद्द केल्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला योग्य दर मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. हा प्रश्न सुटावा यासाठी मी केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह साहेबांसोबत थेट संवाद साधून त्यांना याबाबत लक्ष घालण्याची विनंती केली होती. राज्यातील शेतकऱ्यांच्या अडचणी आणि त्यावरील तातडीने उपाययोजना करण्याची गरज लक्षात घेऊन त्यांनी पुढाकार घेत, पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेबांच्या मार्गदर्शनाखाली हा निर्णय घेण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. त्यामुळे मी त्यांच्यासह पंतप्रधान नरेंद्र मोदी, कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान, केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल आणि संपूर्ण मंत्रिमंडळाचे मनःपूर्वक आभार मानतो. राज्य शासन राज्यातील शेतकऱ्यांच्या हितासाठी कटिबद्ध असून, भविष्यातही शेतकरी हिताचे निर्णय घेतले जातील. असेही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नमूद केले आहे.

## न्यायाधीश यशवंत वर्मा यांच्या प्रकरणामुळे सरन्यायाधीशांचा निर्णय

**दिल्ली -** उच्च न्यायालयाचे न्यायाधीश यशवंत वर्मा यांच्या घरी मोठ्या प्रमाणात रोख रक्कम आढळली होती. त्यानंतर वर्मा यांच्यावर विवध आरोप होत आहेत. या आरोपांची चौकशी करण्यासाठी भारताचे सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी शनिवारी पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश शील नागू, हिमाचल प्रदेश उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश जी.एस. संधावालिया आणि कर्नाटक उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती पान ३ वर

## युवा आदर्श

### वळण ...

उठ सूठ आंदोलन
पुरसे अल्पसे कारण
जरासा करा विरोध
उग्र अवतार धारण
वेगळी फौज तयार
देण्या हिंसक वळण
सार्वजनिक संपत्ती
रेडीमेड असे जळण
उद्रेक सर्वत्र पोचावा
सोईचे दळण वळण
विवेक संवेदनाशून्य
विसरे बा आकळण
विध्वंस मिरवणूकीत
रे अफवांची उधळण
संयमी असून यंत्रणा
संतुलन हो उन्मळण
थयथयाट तो हिंसक
भितीने उडते गाळण
सु व्यवस्थेची मर्यादा
आदेशा समोर लोळण
सु संस्कृत माणूसकी
पुरती होते रे चाळण
नत मस्तक क्रोधापुढे
हरे नितीमत्ता पाळण
दोष खरोखर कुणाचा
चालते चौकशी दळण
मीचं आद्य जबाबदार
रे नको अन्यत्र पळण

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## दृष्टी ही जीवनाचा अमूल्य ठेवा; वेळोवेळी नेत्रतपासणी करून घ्यावी - आ. खोतकर

### १२३ जणांची नेत्र तपासणी; मोतीबिंदू आढळलेल्या ११ जणांवर होणार मोफत शस्त्रक्रिया

**जालना । प्रतिनिधी -** दृष्टी ही जीवनाचा अमूल्य ठेवा आहे. त्यामुळे वेळोवेळी नेत्र तपासणी करून घेणे आवश्यक आहे. कारण अनेक दृष्टीसंबंधी आजार सुरुवातीच्या टप्प्यात लक्षात आले तर त्यावर योग्यवेळी उपचार करून दृष्टी वाचवता येते. अनेकांना लहान वयातच चष्मा लागतो, तर काहींना डोळ्यांच्या आजारांची लक्षणे उशिरा समजतात. लॉयन्स क्लबच्या माध्यमातून नियमितपणे आयोजित केल्या जाणाऱ्या मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरांमुळे गरजू नागरिकांना त्वरित उपचाराची संधी मिळते, त्यामुळे इतर सेवाभावी संस्थांनीही अशी शिबिरे आयोजित करावीत, आपलेही सर्वतोपरी सहकार्य राहील, अशी ग्वाही आ. अर्जुनराव खोतकर यांनी येथे बोलताना दिली.




स्व. गणपतराव पवार यांच्या ३५ व्या स्मृतिदिनानिमित्त लायन्स क्लब ऑफ जालना, गणेश राऊत मित्र मंडळ, संयोजक रामेश्वर पवार, श्याम पवार व स्व. गणपतराव पा. पवार सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यामाने चंदनझिरा येथील न्यू इंद्रायणी हॉटेलमध्ये शनिवार दि. २२ मार्च रोजी आयोजित मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे उद्घाटन आ. खोतकर यांच्याहस्ते झाले, त्याप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी आमदार संतोष सांबरे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष अनिरुद्ध खोतकर, माजी नगरसेवक गणेशराव राऊत, माजी नगराध्यक्ष राजेश राऊत, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, शहरप्रमुख विष्णू पाचफुले यांची उपस्थिती होती. यावेळी लॉयन्सचे जीएसटी कॉर्डिनेटर अतुल लड्डा, झोन चेअरपर्सन राजेश लुनिया, साईनाथ पवार, डॉ. सुनील पवार, डॉ. प्रसाद पवार, सुरेश उपाध्याय, अक्षय पवार, माजी नगरसेवक राधाकिशन दाभाडे, रामेश्वर पवार, श्याम पवार, संतोष रासवे, शांतीलाल राऊत, कैलास पवार, विलास पवार, अशोक जोगदंड, विजय खरात, सिताराम कटारे, कल्याण शेळके, गणेश एखंडे, अजय मिरकड, गजानन ओझा, संतोष डोके, संतोष पवार, रावसाहेब पवार, शिवाजी बजाज, प्रशांत मस्के, सुरज पवार, प्रभाकर पवार, रितेश पंचारिया, सिराज पटेल, दिनेश शेटे, रुपेश जयस्वाल, सुधाकर गायकवाड, हरीप्रसाद मालपाणी, रघुवीर जयस्वाल, रवी भरतिया, प्रवीण शर्मा, शिवराज जाधव, प्रकाश शेळके, रमेश पवार, डॉ. अनिल बोडखे, गजानन कायंदे, रमेश तिवाली, अरुण पेरे, आनंद डहाके, अजय भराटे, शैलेश देशमुख, शुभम राऊत आदींची उपस्थिती होती.

याप्रसंगी माजी आमदार संतोष सांबरे म्हणाले की, लायन्स क्लबच्या माध्यमातून गेल्या कित्येक वर्षापासून मोफत नेत्र तपासणी आणि मोतीबिंदू शस्त्रक्रियेचे महत्वाचे कार्य केले जात असून, त्या माध्यमातून गरजूंना मोठा दिलासा मिळत आहे. अशा उपक्रमांना आपले सदैव सहकार्य राहील. गणेशराव राऊत म्हणाले की, लॉयन्सप्रमाणेच इतर सेवाभावी संस्थांनी ग्रामीण भागात अशी शिबिरे आयोजित करायला हवीत. त्यामुळे ग्रामीण जनतेला मोठा दिलासा मिळेल.

शिबिरात १२३ जणांची नेत्र तपासणी करण्यात आली करण्यात आली. त्यापैकी ११ जणांना मोतीबिंदू असल्याचे निदान झाले असून, त्यांच्यावर चिकलठाणा पान ३ वर

## पंचदिवसीय श्रीपंचकृष्ण चिंतन सोहळा


**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** जाफराबाद तालुक्यातील आंबेगाव येथे सुरू असलेल्या पंचदिवसीय अखंड ईश्वर नामस्मरण व श्रीपंचकृष्ण चिंतन कथा सोहळ्याची बुधवारी सांगता झाली. येथील श्रीकृष्ण ज्ञानमंदिराच्या वर्धापनदिनानिमित्त येथे शनिवारपासून या सोहळ्याला प्रारंभझाला होता. या सोहळ्यात रोज मंगल स्नान, श्रीमद् भगवद्गीता पारायण, ध्वजारोहण, देवपूजा, वंदन, आरती, श्रीपंचकृष्ण संगीत कथा, कीर्तन आदी धार्मिक कार्यक्रम घेण्यात आले. आचार्य चिंचोडीकर बाबा यांनी संगीत कथा सांगितली, तर कीर्तनसेवेत दिनकरमुनी चिंचोडीकर, खंदारकर बाबा, अचलपूरकर बाबा, कळमकर बाबा यांनी सेवा दिली. कार्यक्रमाची सांगता बुधवारी करण्यात आली. यावेळी पंचावतार, उपहार, महाआरती तथा महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. सांगता समारोहासाठी आचार्य लोणारकर बाबा, जालनापूरकर बाबा, आचार्य चिंचोडीकर बाबा, पाथरीकर बाबा, पुष्पाआक्का मेहकरकर, आचार्य दत्तराज शास्त्री, पान ३ वर

## उल्लास-नवभारत साक्षरता कार्यक्रम रविवारी १७ हजार ५५४ नवसाक्षरांची परीक्षा

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यात उल्लास-नवभारत साक्षरता कार्यक्रमाअंतर्गत जिल्ह्यातील १७ हजार ५५४ नवसाक्षरांची परीक्षा रविवार दि.२३ मार्च २०२५ रोजी सकाळी १० ते ५ या वेळेत त्यांच्या गावच्या शाळेतील परीक्षा केंद्रावर घेण्यात येणार आहे. तरी संबंधितांनी परीक्षेसाठी वेळेवर उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जगदीश मिनियार यांनी केले आहे.

उल्लास-नवभारत साक्षरता कार्यक्रमाअंतर्गत परीक्षा ही ऑफलाईन पध्दतीने होणार असून प्रश्नपत्रिका १५० गुणांची असणार आहे. यात वाचन ५० गुण, शब्दलेखन ५० गुण आणि संख्यात्मक ज्ञानासाठी ५० गुण अशी गुणांची विभागणी करण्यात आली आहे. परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी ५१ गुण आवश्यक आहेत. उमेदवारांना परीक्षेसाठी निळा व काळा शाईचा पेन वापरण्याची परवानगी देण्यात आली आहे. जिल्ह्यात परीक्षेसाठी एकुण ९७० परीक्षा केंद्र ठेवण्यात आली आहेत. परीक्षेत दिव्यांग उमेदवारांना ६० मिनिटांचा वेळ अधिकचा देण्यात येणार आहे. असे शिक्षणाधिकारी (योजना), जिल्हा परिषद, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## जनता नाही; पुढारी जातीयवादी – नितीन गडकरी



**अमरावती -** सर्वसामान्य जनता जातीयवादी नाही तर पुढारी जातीवादी आहेत. हे पुढारी आपल्या स्वार्थासाठी जात उभी करतात असं वक्तव्य केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज (२२ मार्च) अमरावतीत केले. अमरावती येथे श्री शिवाजी शिक्षण संस्थेद्वारे डॉ पंजाबराव देशमुख स्मृती पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता, यावेळी नितीन गडकरी यांनी आपल्या भाषणात असे वक्तव्य करत जातीय व्यवस्थेवर भाष्य केलं आहे. शिवाय नागपुरातील हिंसाचाराची घटना घडली असताना त्यांच्या या वक्तव्याला विशेष महत्व प्राप्त झाले आहे.

या कार्यक्रमात पुढे बोलताना नितीन गडकरी म्हणाले की, माझा मुलगा आहे म्हणून त्याला राजकारणात स्थान मिळेल हे मला मान्य नाही. त्यांनी त्याच्या कर्तुत्वावर स्थान निर्माण करावे. आमदाराच्या पोटातून आमदार नाही झाला पाहिजे, खासदाराच्या पोटातून खासदार नाही झाला पाहिजे. आमदार खासदारांनी म्हणायच्या ऐवजी जनतेने आणि कार्यकर्त्यांनी जर म्हटलं तर त्यांना अधिकार आहे. जे लोक आपलं कर्तृत्व सिद्ध करतात त्यांना हा पूर्ण अधिकार आहे. कुणाचा मुलगा, मुलगी असणे गुन्हा नाही. आज आपल्या सामाजिक जीवनामध्ये राजकारणाचा अर्थच समराजकारण आहे. विकासकारण आहे. मी लोकसभेत निवडून आलो पण मी लोकांना सांगितलं माझ्या हिशोबाने राजकारण चालेल, तुमच्या हिशोबाने नाही. तुम्हाला मत द्यायचं असेल तर द्या, नाही द्यायचं असेल तरी चालेल. जो मत देईल त्याचे काम करेल, जो नाही देईल त्याचेही काम करेल. त्यामुळे जनता जातीयवादी नाही तर पुढारी जातीवादी आहेत, हे पुढारी आपल्या स्वार्थासाठी जात उभी करतात असेही नितीन गडकरी म्हणाले.

अमरावती येथील श्री शिवाजी शिक्षण संस्थेद्वारे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना प्रतिष्ठेचा 'डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती पुरस्कार २०२४'ने आज (२२ मार्च) अमरावतीत सन्मानित करण्यात आले. यावेळी पाच लाख रोख, स्मृतिचिन्ह, मानपत्र, शाल व श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप होतं. तसेच या सोहळ्यात राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी दिलेल्या दाननिधीतून विदर्भातील उत्कृष्ट शेतकरी महिलेला 'शारदाबाई पवार उत्कृष्ट महिला शेतकरी पुरस्कार २०२४' आणि श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या वतीने 'श्रीमती विमलाबाई देशमुख शेतीनिष्ठ महिला शेतकरी पुरस्कार २०२४' असे दोन पुरस्कार अकोला येथील वंदना धोत्रे आणि भंडारा जिल्ह्यातील वंदना वैद्य या दोन उत्कृष्ट शेतकरी महिलांना दिल्या गेले.

सोबतच यावेळी श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या विविध पुरस्कार सोहळा पार पडला. या कार्यक्रमाला खासदार डॉ अनिल बोंडे, खासदार बळवंत वानखडे, आमदार संजय खोडके, आमदार सुलभा खोडके, माजी आमदार प्रवीण पोटे, शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. यावेळी नितीन गडकरी यांनी पुरस्काराची रक्कम परत करत म्हणाले की, मला ५ लाख रुपये पुरस्कारातून मिळाले. त्यात २० लाख रुपये टाकून मी २५ लाख रुपये देत आहे. ते २५ लाख रुपये विदर्भातील पाच शेतकऱ्यांना पुरस्कार म्हणून संस्थेने द्यावं, अशी मोठी घोषणा नितीन गडकरी यांनी केली.

## संपादकीय

## जरा याद करो कुर्बानी

दीडशे ते दोनशे वर्ष इंग्रजांच्या पारतंत्र्यात असणाऱ्या भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी हजारो स्वातंत्र्य सैनिकांनी स्वतःच्या जीवाचे बलिदान दिले. अनेक जण फासावर चढले तर कित्येकांनी इंग्रजांच्या गोळ्या छातीवर झेलल्या. या वीर स्वातंत्र्य सैनिकांच्या बलिदानाने १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत माता इंग्रजांच्या गुलामीतूम मुक्त झाली. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी छातीवर गोळ्या झेलल्या तर अनेक स्वातंत्र्य सैनिक हसत हसत फासावर चढले. भगत सिंग, राजगुरू आणि सुखदेव हे स्वातंत्र्य सैनिक देखील भारत मातेला इंग्रजांच्या गुलाम गिरीतून मुक्त करण्यासाठी हसत हसत फासावर चढले आणि शहीद झाले. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी आपल्या जीवाची बाजी लावणारे स्वातंत्र्य सैनिक शहीद भगतसिंग, राजगुरु व सुखदेव यांना २३ मार्च १९३१ रोजी इंग्रजांनी फाशी दिली होती. आज २३ मार्च हा दिवस शहीदांच्या नावे कोरला गेला गेला आहे. आजच्याच दिवशी म्हणजे २३ मार्च १९३१ रोजी शहीद भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी स्वतःच्या प्राणाचे बलिदान दिले. ९४ वर्षांपूर्वी आजच्याच दिवशी इंग्रजांनी भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना फाशी दिली होती. देशासाठी प्राणाची आहुती देणाऱ्या शहिदांना आदरांजली वाहण्यासाठी आजचा दिवस संपूर्ण देशात शहीद दिवस म्हणून साजरा केला जातो. १९२८ मध्ये सायमन कमिशन नावाचे शिष्टमंडळ भारतात आले होते. या कमिशनला विरोध म्हणून लाला लजपतराय यांनी मोठा मोर्चा काढला होता. सायमन कमिशनला विरोध करणाऱ्या लाला लजपतराय यांच्यावर इंग्रजांनी लाठीहल्ला केला. या लाठी हल्ल्यात लाला लजपतराय गंभीर जखमी झाले त्यातच त्यांचा मृत्यू झाला. लाला लजपतराय यांच्या मृत्यूनंतर संपूर्ण देशात इंग्रजांविरुद्ध संतापाची लाट उसळली. लाला लजपतराय यांच्या मृत्युनंतर देशातील जहाल गटाचे स्वातंत्र्य सैनिक कमालीचे चिडले. चंद्रशेखर आझाद, भगतसिंग, राजगुरु, सुखदेव आणि अन्य जहाल क्रांतिकारकांनी लाला लजपतराय यांच्या मृत्यूचा बदला घेण्याची शपथ घेतली. लाला लजपतराय यांच्या मृत्यूच्या एक महिन्याच्या आतच या क्रांतिकारकांनी आपली शपथ पूर्ण केली आणि १७ डिसेंबर १९२८ रोजी ब्रिटिश अधिकारी सँडर्सला गोळ्या घालून ठार केले. काही काळ ते भूमिगत राहिले मात्र फितुरीमुळे ते पोलिसांच्या हाती लागले. ७ ऑक्टोबर १९३० रोजी इंग्लिश कोर्टाने भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना फाशीची शिक्षा सुनावली. यानंतर भगतसिंग यांची शिक्षा कमी व्हावी यासाठी फेर याचिका दाखल करण्यात आली मात्र १० मार्च १९३१ रोजी ती याचिका कोर्टाने फेटाळली. २३ मार्च हा दिवस भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांच्या फाशीसाठी निश्चित करण्यात आला. २३ मार्च १९३१ रोजी सकाळी ७ वाजून ३३ मिनिटांनी भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना फाशी देण्यात आली. फाशीच्या वेळी या तिघांनी मेरा रंग दे बसंती चोला... हे गाणे गायले. फासावर लटकतानाही भारत मातेच्या या सुपुत्रांच्या चेहऱ्यावर कसल्याही प्रकारचे दुःख किंवा पश्चाताप नव्हता उलट भारत मातेसाठी फासावर जात असल्याचा अभिमान होता. आजच्या दिवशी भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतूम मुक्त करण्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या क्रांतिकारकांच्या बलिदानाचे स्मरण करणे हे प्रत्येक भारतीयांचे कर्तव्य आहे. भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या असंख्य ज्ञात अज्ञात शहिदांना शाहिद दिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## वाचकांचे मनोगत

## ३१८ वर्षानंतर औरंगजेब कबर प्रश्न ऐरणीवर!

औरंगजेब दफन सन १७०७ मधील त्यानंतर तेथे कबर बांधण्यात आली. ३१८ वर्षानंतर औरंगजेब कबर हटवण्याची मागणी होते आहे. कबरीच्या देखभालीची जबाबदारी केंद्र सरकार आणि राज्य सरकारची आहे,तसेच आर्थिक निधी देत आहेत. आपल्या देशाला धर्म रक्षणाची परंपरा आहे.हे कबर हटाव म्हणणारांना माहीत नाही काय? जेव्हा जेव्हा आपल्या देशावर परकीय आक्रमणे झाली तेव्हा तेव्हा धर्म रक्षणासाठी स्वराज्य रक्षकांनी प्राणाची आहुती देऊन रयतेचे रक्षण केले.छत्रपती संभाजी महाराज यांच्यावर आधारित छावा चित्रपट प्रदर्शित झाल्यावर इतिहास जनतेसमोर आला. त्यानंतर उद्भवलेल्या परिस्थितीने हिंसाचार वाढीस लागत असताना चिथावणीखोर वक्तव्ये करणे गंभीर बाब आहे. वंदनीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी जाहीर सभांमधून औरंगाबाद जिल्ह्याचे संभाजीनगर केले होते.त्यानंतर कित्येक वर्षानंतर अधिकृत संभाजीनगर जिल्हा असे नामकरण सरकारने केले. कबरीवर नजर ठेवून दोन धर्मात तेढ निर्माण होणार नाही ही जबाबदारी सरकारची आहे.केंद्र व राज्य सरकारकडून यांच्यावर निर्णय घेण्यात यावा.

**महादेव गोळवसकर,**
**कुर्ला मुंबई, ९८६९४७६२०९**
mahadeogolvaskargmail.com

**झाडे लावा झाडे जगवा**

# सुर्य-चंद्र, आकाश-पाताळ आहे, तोपर्यंत भारतमातेच्या भुमिपुत्रांचे नाव अमर राहील

आज शहीदांच्या पुंण्यायीनेच देशाची १४० कोटी जनता खुला स्वास घेत आहे.अनेक क्रांतिकारक, थोर पुरुष यांच्या अथक परिश्रमाने,प्रयत्नाने व बलिदानाने १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. क्रांतिकारकांनी कोणत्याही गोष्टीची व आपल्या परिवाराची पर्वा न करता इंग्रजांना सडेतोड उत्तर देऊन स्वतंत्र भारताची मशाल १९४७ ला प्रज्वलीत केली.१९२८ ला भारतातील घडामोडींचा अभ्यास करण्यासाठी इंग्लंडहून सायमन कमिशन नावाचे शिष्टमंडळ भारतात आले.त्यावेळी सायमन कमिशन नावाचे वादळ रोखण्यासाठी लाला लजपतराय यांनी पुढाकार घेऊन सायमन परत जाच्या घोषणांनी संपूर्ण भारत एकवटला.ही बाब सायमन कमिशनचे अधिकारी सँडर्स यांना पचली नाही. लाला लजपतराय यांच्या नेतृत्वाखाली लाखोंच्या संख्येने प्रदर्शनकारी जमा झाले.यामुळे सायमन कमिशनची घाबरगुंडी उडाली. जमाव पांगवण्यासाठी सँडर्स यांनी लाठीचार्जचा आदेश दिला.यात लाला लजपतराय घायाळ झाले आणि त्यातच १७ डिसेंबर १९२८ ला त्यांचा अंत झाला.त्यांच्या मृत्यूमुळे संपूर्ण भारतात शोककळा पसरली. हे दु:ख भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांना पाहवले नाही. त्यामुळे क्रांतिकारकांच्या तळपायाची आग मस्तकात गेली आणि लाला लजपतराय यांच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी क्रांतिकारकांनी दृढनिश्चय करून व्युहरचना तयार केली आणि लाला लजपतराय यांच्या मृत्यूला कारणीभूत असणारा इंग्रज अधिकारी सँडर्स याला ठार मारण्याचे ठरविले.लाला लजपतराय यांच्या पहिल्या मासिक श्राध्दाच्या दिवशी भगतसिंग,राजगुरू आणि सुखदेव हे तिघेही वेष बदलुन सँडर्स यांच्या निवासस्थानी गेले. सँडर्स दिसताच सुखदेव यांनी संकेत दिले. संकेत मिळताच भगतसिंग आणि राजगुरू यांनी एकाचवेळी गोळ्या झाडून सँडर्सला जागीच ठार केले व तेथुन पलायन केले.यामुळे इंग्रज आगबबुला झाले व इंग्रजांनी तिघांना पकडण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू केले.बरेच दिवस इंग्रजांना हुलकावणी देत तिन्ही क्रांतिकारक भूमिगत राहिले. परंतु फितुरीमुळे ते पकडले गेले. शेवटी २३ मार्च १९३१ ला भारतमातेच्या तिन्ही सुपुत्रांना इंग्रजांनी फाशी दिली. यामुळे संपूर्ण भारत स्तब्ध होऊन सर्वत्र शोककळा पसरली.भारत स्वतंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या या तिन्ही सुपुत्रांना कोन्हीही कधीही विसरणार नाही.जो पर्यंत सुर्य-चंद्र, आकार-पाताळ आहे तोपर्यंत या शहिदांना कोणीही विसरणार नाही. भगतसिंग राजगुरू आणि सुखदेव यांचे बलीदान पाहून १४० कोटी जनतेच्या तळपायाची आग आजही मस्तकात जाते.परंतु ९५ टक्के राजकीय पुढारी शहिदांना विसरल्याचे दिसून येते.कारण ९५ टक्के राजकीय पुढारी आज देशसेवा, सामाजिक सेवा व देशांच्या विकासापेक्षा स्वत:च्या विकासाकडे जास्त लक्ष देताना दिसतात. राजकीय पुढाऱ्यांनो याद राखा जोपर्यंत तुम्ही देशाच्या विकासासाठी, जनतेच्या हितासाठी, गोरगरिबांच्या कल्याणासाठी संपूर्णपणे ताकद लावणार नाही तोपर्यंत शहिदांच्या आत्म्याला शांती मिळणार नाही व त्यांना राजकीय दृष्ट्या खरी श्रद्धांजली म्हणता येणार नाही. क्रांतिकारक,शहिद हसत-हसत फासावर का चढले यामागचा त्यांचा एकच उद्देश होता.तो म्हणजे मातृ भुमिची रक्षा करून सर्वसामान्यांना न्याय मिळावा व भारत स्वतंत्र होवून सुख शांती निर्माण व्हावी आणि देश सुजलाम सुफलाम व्हावा.परंतु आजचा राजकीय पुढारी असा झाला आहे की लोका सांगे ग्याण व स्वत: कोरडे पाषाण यामुळेच या कृषी प्रधान देशात मुठभर राजकीय पुढारी करोडपती झाल्याचे दिसून येतात व करोडपती शेतकरी शुन्य झालेला दिसुन येतो.कारण आजचा राजकीय पुढारी पाच वर्षासाठी लोकप्रतिनिधी बनतो खरा परंतु पाच वर्षाच्या काळात करोडपती बनतो ही कसली देश सेवा म्हणावी!यामुळे भारतात अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की श्रीमंत हा दिवसेंदिवस श्रीमंत होत आहे व गरीब, सर्वसामान्य,शेतकरी हा गरीबीच्या खाईत जात आहे.या संपूर्ण बाबींची जान राजकीय पुढाऱ्यांनी ठेवली पाहिजे व देशसेवा आणि जनसेवा याकडे सर्वांनीच लक्ष केंद्रित केले पाहिजे तेव्हाच राजकीय पुढाऱ्यांची शहीदांना खरी श्रद्धांजली समजल्या जाईल.राजकीय पुढाऱ्यांना कोणत्याही लढाईवर जाण्याची गरज नाही.फक्त शहिदांचे अनुकरण करून लोकप्रतिनिधी, जनप्रतिनिधी या पदाला कलंकित न करता यांचा योग्य उपयोग करून जनसेवा व लोककल्याणाची कामे केली पाहिजे. तेंव्हाच शहिदांना खरी श्रद्धांजली ठरेल व शहिदांच्या आत्म्याला शांती मिळेल.संपुर्ण देश शहिद दिनाला शहिदांना आपली आदरांजली अर्पण करीत आहे.परंतु शहिदांचे बलीदान व्यर्थ जाणार नाही याची जाण मुख्यत्वेकरुन राजकीय पुढाऱ्यांनी ठेवण्याची गरज आहे.राजकीय पुढाऱ्यांनो थोडे ७८ वर्षे मागे वळून पहा व क्रांतिकारकांना देश स्वातंत्र्यासाठी कायकाय यातना भोगाव्या लागल्यात याचे अनुकरण करून चिंतन करा आणि त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून समाजसेवा करण्याची तत्परता दाखवा. कारण राजकीय पुढाऱ्यांचे लक्ष देशसेवेपेक्षा फक्त स्वत:चे हीत साधण्याचा प्रयत्न जास्त असतो.दिनांक १९ मार्च २०२५ बुधवारला दैनिक तरुण भारत वर्तमानपत्रात प्रकाशित झालेल्या माहितीनुसार जाहीर केलेल्या एका स्वयंसेवी संस्था असोसिएशन ऑफ डेमोक्रॅटिक रिफॉम्सच्या (एडीआर) अहवालात असे दिसून आले की देशातील ४५ टक्के आमदारांवर गुन्हेगारी खटले दाखल आहेत ही स्वतंत्र भारतासाठी दुःखद व धक्कादायक बाब आहे.यांना कसले लोकप्रतिनिधी म्हणावेत हाही प्रश्न उपस्थित होतो.त्यामुळे यावर अंकुश लावने अत्यंत गरजेचे आहे.करीता सावधान राजकीय पुढाऱ्यांनो कोणतेही कार्य करतांना शहिदांचे अनुकरण अवश्य करावे व त्यांच्या बलीदानाला कोठेही ठेच किंवा तडा पोहचणार नाही याची दक्षता घ्यावी.शहिद दिनाच्या निमित्ताने देशवासीयांना हेच सांगु इच्छितो की बदलत्या हवामानामुळे देशातील वाढते प्रदुषण धोकादायक स्थितीत येवून ठेपले आहे व प्रदूषणाच्या बाबतीत जगामध्ये भारताचा तिसरा क्रमांक लागतो.याकरीता शहिद दिनाचे औचित्य साधून राजकीय पुढारी, सामाजिक संघटना व सर्वसामान्य नागरिकांनी आपल्यापरीने वृक्षारोपण करून जास्तीत जास्त वृक्षलागवड करण्याचा संकल्प केला पाहिजे हीच शहिदांना खरी श्रद्धांजली ठरेल व हे वृक्ष अनंत काळापर्यंत आपल्या स्मरणात राहील आणि शहिदांचे स्मरण आपल्याला प्रत्येक झाडाच्या पानात,फुलात,फळात दिसुन येईल.हे भारत मातेच्या शहिद भुमि पुत्रांनो माझा कोटी कोटी प्रणाम जब तक सुरज चांद रहेंगा तबतक शहिदोंका नाम रहेंगा जय हिंद!

**रमेश कृष्णराव लांजेवार,**
**स्वतंत्र पत्रकार, नागपूर**
**मो.नं.९९२१६९०७७९.**

# बदलते हवामान संपूर्ण सृष्टीसाठी चिंताजनक

जगातील भयावह घटना पहाता बदलत्या हवामानावर नियंत्रण ठेवणे काळाची गरज.जगात महाप्रलय,भुकंप, सुनामी,वनवे लागणे, ज्वालामुखीचा उद्रेक,अवकाळी पाऊस,अती उष्णता,अती थंडी, ग्लेशियर वितळणे, समुद्राची पातळी वाढने किंवा येणाऱ्या नैसर्गिक आपदा याची सुचना यावर नियंत्रण कसे ठेवता येईल व येणाऱ्या नैसर्गिक आपदांची माहिती कशी मिळु शकेल याउद्देश २३ मार्च १९५० ला जागतिक हवामान संस्थेची स्थापना करण्यात आली.यापुर्वी १९२२ ला हवामान शास्त्रज्ञ लुइस फ्राय रिचर्डसन यांनी हवामानाच्या अंदाजाचा शोध लावुन हवामान पहाण्याकरीता सांख्यिकी पध्दत शोधून त्यानुसार काही प्रमाणात हवामान अंदाज वर्तविता येऊ लागले व हवामानाबद्दल जागरूकता निर्माण करण्याचे काम केले. हवामान शास्त्रज्ञ लुइस फ्राय रिचर्डसन यांनी लावलेला शोध आज जगाला अत्यंत कारगर आणि गुणकारी सिध्द झाल्याचे आपण पहातो.त्याच अनुषंगाने १९५० ला जागतिक हवामान संस्थेची (डब्लुएमओ) स्थापना करण्यात आली या संस्थेचे मुख्यालय स्वित्झर्लंड येथील जिनेव्हा येथे आहे. यानंतर (डब्लुएमओ) संयुक्त राष्ट्राची (युएन)विषेश संस्था बनली. पहिला जागतिक हवामान दिवस २३ मार्च १९६१ रोजी साजरा करण्यात आला. त्यावेळी ३१ सदस्य देश होते आता या आंतरराष्ट्रीय संघटनेचे १९३ देशांपेक्षा जास्त सदस्य आहेत. पर्यावरणातील वाढते बदल याबद्दल जागरूकता निर्माण करण्याच्या अनुषंगाने या दिवसाला अत्यंत महत्व आहे.गेल्या २० वर्षात युद्धजन्य परिस्थिती, वाढते औद्योगिकीकरण, परमाणु परिक्षण, मोठ्या प्रमाणात जंगलतोड इत्यादी अनेक कारणांमुळे हवामानातील बदलाने जगातील पर्यावरणाची चिंता दिवसेंदिवस वाढत आहे.कारण आज जगातील पर्यावरण अत्यंत धोकादायक व भयावह स्थितीत येवून ठेपले आहे.यामुळे मानव,पशु-पक्षी व संपूर्ण जीवसृष्टीला मोठा धोका निर्माण झाला आहे. आज जगामध्ये वाढते औद्योगिकीकरण, वायुप्रदूषण, जंगलतोड, युद्धजन्य परिस्थिती, वाढती उष्णता, वाढती लोकसंख्या यामुळे हवामानात रोज वेगवेगळे आमुलाग्र बदल होतांना आपण पहातो. जगात महाप्रलय, सुनामी, भुकंप, ज्वालामुखीचा उद्रेक,अती पाऊस, अती थंडी, अती उष्णता, वणवे लागणे, नैसर्गिक आपत्ती अशा अनेक घटना जगात मानवाच्या अतिरेकामुळे दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढत आहे.या येणाऱ्या आपदांची सटीक माहिती हवामान विभाग जगभर देत असते. यामुळे जगातील देश सतर्कता बाळगुन सुरक्षेच्या दृष्टिकोनातून पाऊले उचलतात. त्यामुळे आपण समजू शकतो की हवामान खात्याची भुमिका जगासाठी अत्यंत मोलाची आणि महत्त्वाची आहे. आज अत्याधुनिक युगात उपग्रहांच्या (सेटेलाईटच्या) माध्यमातून हवामानातील बदलांचे संकेत हवामान संस्था जगभरातील संपूर्ण देशांना वेळोवेळी देत असते.हवामानातील बदलांचे संकेत लोकांमध्ये जागृता निर्माण करण्याचे काम करीत असते. हवामान दिनाचे औचित्य साधून व हवामानातील वाढते बदल व धोका पहाता निसर्गाला संतुलित ठेवणे गरजेचे आहे.याकरीता जगातील संपूर्ण देशांनी हवामानातील मोठ्या प्रमाणात वाढते बदल पहाता आजच्या दिवसाला जास्तीत जास्त वृक्षारोपण करने अत्यंत गरजेचे आहे.यामुळे वाढत्या हवामानातील बदलांवर नियंत्रण ठेवण्यास मोठी मदत होईल. सोबत निसर्ग प्रफुल्लित राहुन संपूर्ण जंगलातील पशु-पक्ष्यांसाठी एक आल्हाददायक वातावरण निर्माण



होईल. कारण हवामानाचे संपूर्ण गणित निसर्गावरच अवलंबून आहे. त्यामुळे निसर्ग सुरक्षित रहाला तर हवामान सुध्दा सुरक्षित राहू शकते.याचा फायदा संपूर्ण जगाला व जीवसृष्टीला होईल.

**रमेश कृष्णराव लांजेवार,**
**स्वतंत्र पत्रकार, नागपूर**
**मो.नं.९९२१६९०७७९.**






### जेईएस महाविद्यालयात विधीनाट्य शिबिरास सुरुवात

# विधिनाट्य शिबिरातून सांस्कृतिक जान असणारे कलावंत तयार होतील - प्राचार्य डॉ. अग्निहोत्री

**जालना । प्रतिनिधी -** विधिनाट्य हे महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचे अविभाज्य अंग आहे. त्याविषयीचा सखोल अभ्यास लोक कलावंतांनी करायला हवा. या शिबिरातून सांस्कृतिक जान असणारे कलावंत तयार होतील असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांनी केले.

येथील जेईएस महाविद्यालयातील लोककला विभागात सांस्कृतिक कार्य संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या वतीने आयोजित विधीनाट्य शिबिराच्या उदघाटण प्रसंगी डॉ. अग्निहोत्री बोलत होते. या प्रसंगी व्यासपीठावर समाजसेवक हरीश भैया देवावाले, मराठी विभाग प्रमुख डॉ. यशवंत सोनुने आणि शिबिर संयोजक शाहीर आप्पासाहेब उगले उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते आई रेणुका देवीचे प्रतिमेचे पूजन करून व विद्यार्थ्यांनी गोंधळ कला प्रकारातून गणरायाची आराधना सादर केली. त्या नंतर शिबिर संयोजक शाहीर आप्पासाहेब उगले यांनी शिबिर आयोजना मागची भूमिका विशद केली.

पुढे बोलताना डॉ. अग्निहोत्री म्हणाले की, शासनाने राबवलेल्या या शिबिरामुळे नवनवीन लोककलावंत घडतील आणि या लोककलाकारामुळेच लोक संस्कृती आणि परंपरा टिकून राहील. त्यामुळे या शिबिराचा विद्यार्थ्यांनी या संधीचा नक्कीच फायदा घ्यावा.

या मान्यवराच्या मनोगता नंतर शिबिर संचालक लोकशाहीर आप्पासाहेब उगले म्हणाले की, महाराष्ट्राची लोक संस्कृती लोक परंपरा व लोककलेचे संवर्धन व्हावे, नवोदित कलाकार निर्माण व्हावे लोक साहित्याचे जतन व्हावे या उद्देशाने या विधीनाट्य शिबिराचे आयोजन केले आहे. या शिबिरामध्ये गोंधळ, जागरण, भराड, मुंज यासारख्या



विधीनाट्याची परंपरा असलेल्या कला प्रकाराचे प्रशिक्षण या दहा दिवसीय शिबिरात विद्यार्थ्यांना नामवंत व अभ्यासू लोककलावंतांचे मार्गदर्शन मिळणार आहे.

लोकसंगीतातील लोकवाद्य आणि वाद्याची साथसंगतीच कशी असावी हे प्रशिक्षण या शिबिरात देणार आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लोककला विभाग प्रमुख प्रा. कल्याण उगले यांनी केले. या प्रसंगी प्रा. भाग्यश्री बियाणी , डॉ. बी. जी. श्रीरामे , प्रा. बाबासाहेब खंडाळे, डॉ. प्रवीण चंदनशिवे, प्रा. उद्धव बिन्रिवाले आणि शिबिरार्थी कलावंत उपस्थित होते.

## महात्मा ज्योतीबा फुले जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी वानखेडे, कार्याध्यक्ष रत्नपारखे

**जालना । प्रतिनिधी -** दरवर्षीप्रमाणे याही वर्षी महात्मा फुले यांच्या १९८ व्या जयंतीनिमित्त यावर्षी ११ एप्रिल २०२५ रोजी ११ हजार १९८ बुंदीचे लाडुचे वाटप जालना शहरात करण्यात येणार आहे. महात्मा ज्योतीबा फुले जयंती उत्सव समिती २०२५ च्या अध्यक्षपदी बाबासाहेब शिवाजी वानखेडे यांची तर कार्याध्यक्षपदी सुरेश रत्नपारखे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

जालना शहरातील सावता मंगल कार्यालयात आयोजित बैठकीत ही निवड करण्यात आली. यावेळी आश्विन अंबेकर, संतोष जमधडे, शिवकुमार राऊत, विष्णु पाचफुले, गणेश तरासे, लक्ष्मण इधाटे, शंकर तारो, सचिन वानखेडे, शंकर घोडके, काळुराम घोडके, मुन्ना भोसले, भाऊसाहेब घुगे, मंगला खांडेभराड, राजेंद्र जाधव, सुरेश रत्नपारखे, शिवकुमार राऊत, सुयोग खर्डेकर, , कडुबा वाकीकर, वैजीनाथ नागरे, गोकुळ स्वामी, ॲड. हर्षद बागवान, दलितमित्र बाबुराव मामा सतकर, नंदकिशोर जांगडे, दत्ता खांडेभराड, ॲड. रामेश्वर खांडेभराड, अनिल वाघमारे, नितीन तायडे, रामचंद्र फुलझाडे, बबन खरात, बाळु देशमुख यांची उपस्थिती होती.

उपाध्यक्षपदी डॉ. श्रावण शेवाळे, दिपक




वैद्य, नितीन इंगळे, गणेश तरासे, संदीप मगर, अमोल धानुरे, डॉ. विशाल धानुरे, शिवकुमार राऊत, सहसचिव बाबासाहेब सोनुने, सदस्य नितीन तायडे, बाबासाहेब वानखेडे, गंगुबाई वानखेडे, गोकुळ स्वामी, राजेंद्र जाधव, विजय पवार, सुरेशकुमार रत्नपारखे, मंगला खांडेभराड, गंगुबाई वानखेडे ,सय्यद सलमान आदिंची निवड करण्यात आली.

## ऋषी महाराज विद्यालयात वन दिवस साजरा

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** बावणे पांगरी येथील ऋषि महाराज आदर्श विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय शाळेमध्ये २१ मार्च जागतिक वन दिवस साजरा करण्यात आले
डोणगांव पुढारी वृत्तसेवा बदनापूर तालुक्यातील बावणे पांगरी येथील ऋषी महाराज आदर्श विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय शाळेमध्ये दि २१ रोजी जागतिक वन दिवस साजरा करण्यात आले होते यावेळी त्यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य कृष्ण जाधव होते तर प्रमुख पाहुणे म्हणून वन विभाग महाराष्ट्र राज्य चे योगेश डोमळे होते वन परिमंडळ अधिकारी भोकरदन ज्ञानेश्वर पवार , वनरक्षक भोकरदन, समाधान कोल्हे , वनरक्षक बावणे पांगरी, गणेश नागरगोजे , वनरक्षक जाफ्राबाद सुनिता सुरूसे , प्राचार्य कृष्ण जाधव उपप्राचार्य संदीप सोनुने यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये हा कार्यक्रम घेण्यात आला त्यावेळी बोलताना योगेश डोमळे म्हणाले की विद्यार्थ्यांनो आपण वन्य प्राण्यावर प्रेम करावे व वन्यवर प्राणी पक्षी संरक्षण करण्याकरिता मदत करण्यात यावी व पर्यावरण वर्षामध्ये स्वतः पाच साडे आपल्या परिसरात लावून त्याचे



संगोपन करावे येणाऱ्या पिढींना त्याचा परिवर्तनाला फायदा मिळू शकतो असे प्रयत्न करण्यात यावे कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रदीप पाटोळे तर आभार गुलाब राठोड यांनी आभार व्यक्त केले यांनी केले त्यावेळी विद्यार्थी विद्यार्थिनी सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते

## वैद्यकीय संघटनेच्या अध्यक्षपदी डॉ. लहाने तर सचिवपदी डॉ. सोरमारे

**जाफराबाद । प्रतिनिधी -** वैद्यकीय संघटनेची तालुका कार्यकरिणी नुकतीच जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये तालुकाध्यक्षपदी डॉ. मयूर लहाने, उपाध्यक्षपदी डॉ. उमेश चव्हाण तर सचिवपदी डॉ. अमोल सोरमारे यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आहे. नवनिर्वाचित कार्यकारिणीसह पदाधिकाऱ्यांचा ज्येष्ठ डॉ. शेषराव पालकर व डॉ. विजय वायाळ यांच्या हस्ते शाल व पुष्पहार घालून सत्कार करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी डॉ. शेषराव पालकर, डॉ. अनिल चव्हाण, डॉ. स्वप्निल उबरहंडे, डॉ. संजय सावळे डॉ. सदानंद सोळुंके, डॉ. सचिन अंभोरे, डॉ. सतीश शिंदे, डॉ. नीलेश लोखंडे, डॉ. विजय वायाळ, डॉ. राहुल सोनुने, डॉ. नीलेश गवते, डॉ. विकास फदाट, डॉ. हरिदास फुके, डॉ. मधुकर सरोदे, डॉ. प्रदीप बंगाळे, डॉ. रवि उबाळे, डॉ. राम गारडे, डॉ. गजानन पडघान, डॉ. गजानन जोशी, डॉ. प्रवीण काळे, डॉ. भालचंद्र रिंढे, डॉ. माजीद पठाण, डॉ. माजीद सिद्दीकी, किशोर गवते, डॉ. राजेंद्र रिंगे, डॉ. सतीश भोंडे, डॉ. साहेबराव भोपळे, डॉ. रमेश हरणे, डॉ. जुनेद सिद्दीकी, डॉ. सिराजोद्दीन सय्यद, डॉ. निखिल खंडागळे, डॉ. तुहीन बिश्वास, डॉ. रेहान देशमुख यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते प्रभाकर गाढे, ग्रामसेवक सुनील लोखंडे, कमलाकर लक्कस, निवृत्ती वायाळ, ॲड. विकास जाधव, नीलेश जाधव, एकनाथ भोपळे यांची उपस्थिती होती.

## राज्य शासनाचे पायाभूत सुविधा क्षेत्रातील सर्वोत्तम काम बँकांसाठी आश्वासक - मुख्यमंत्री

**मुंबई -** महाराष्ट्र प्रगतीशील राज्य असून राज्यातील पायाभूत सुविधा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी सर्व बँकाचे सहकार्य नेहमीच मिळत आले आहे. राज्यातील रस्त्यांची गरज लक्षात घेवून रस्ते विकासासाठी नियोजन करण्यावर भर देण्यात येत आहे. समृध्दी महामार्गासारख्या यशस्वी पायाभूत सुविधांच्या कामामुळे आज अनेक बँका राज्यातील पायाभूत सुविधा प्रकल्पांना कर्ज देण्यासाठी पुढे येत आहेत. राज्य शासनाचे पायाभूत सुविधा प्रकल्पांतील सर्वोत्तम काम हे बँकासाठी आश्वासक बाब ठरत असून बँकाकडून शासनाला यापुढेही असेच सर्वोत्तम सहकार्य मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. विधानभवन येथे महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ (एमएसआयडीसी) आढावा बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीला सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, विकास खारगे, मनीषा म्हैसकर, अश्विनी भिडे, विविध बँकाचे अधिकारी उपस्थित होते.

## लोअर दुधनात ४६.७२ टक्के पाणीसाठा शहराला महिन्यात दहाच दिवस पाणी

**परतूर । प्रतिनिधी -** परतूर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या लोअर दुधना प्रकल्पात ४६.७१ टक्के जीवंत पाणीसाठा असताना शहराला मात्र तीन दिवसआड म्हणजेच महिन्यात केवळ दहा दिवस पाणीपुरवठा करण्यात येत आहे.नगरपालिकेने किमान उन्हाळ्याच्या दिवसात तरी दोन दिवसआड पाणीपुरवठा करावा अशी मागणी करण्यात येत आहे. परतूर शहराला लोअर दुधना प्रकल्पातून पाणीपुरवठा केला जातो. सध्या या प्रकल्पात ४६.७१ टक्के जीवंत पाणीसाठा उपलब्ध आहे. मागील वर्षी २२ मार्च या तारखेपर्यंत प्रकल्पात केवळ २१ टक्के पाणीसाठा होता हे विशेष. मात्र तरीही शहराला तीन दिवसआड पाणीपुरवठा करण्यात येत होता.

सध्या उन्हाळ्याचे दिवस आहेत. कडाक्याचे ऊन पडत आहे.शहरात पाणीप्रश्न प्रकर्षाने जाणवत आहे. नगरपालिकेच्या वतीने शहरात महिन्यात केवळ दहा दिवस पाणीपुरवठा केला जातो. उन्हाळ्याची तीव्रता पाहता तीन ऐवजी दोन दिवसआड पाणीपुरवठा करण्याची गरज आहे.

पाणीटंचाई निवारणार्थ शहरात नगरपालिकेच्या वतीने विविध भागात हातपंप घेण्यात आले आहेत.यातील अनेक हातपपांना आजही चांगले पाणी आहे. व अनेक हातपंप नादुरुस्त आहेत. नादुरुस्त हातपंप दुरुस्त करण्याची गरज असल्याचे अर्जुन पाडेवार.यांनी वारंवार नगरपालिकेत तक्रारी केल्या आहेत.मात्र याकडे नगरपालिकेचे दुर्लक्ष होताना दिसत आहे. सध्या शहराला दररोज पाणीपुरवठा करता येईल एवढे मुबलक पाणी उपलब्ध आहे.तसेच नादुरुस्त हातपंप दुरुस्त करण्याची गरज आहे.व शहराला भरपूर पाणीपुरवठा व्हावा नसता उपोषण करण्याचा इशारा अर्जुन पाडेवार, सामाजिक कार्यकर्ते यांनी दिला आहे.

## पीएम श्री शाळांच्या शिक्षकांसाठी अभ्यास दौरा

**दत्ता देशमुख**
**जाफ्राबाद -** पीएम श्री म्हणजे प्रधानमंत्री स्कूल्स फॉर रायझिंग इंडिया. प्रधान मंत्री नरेंद्र मोदी यांच्या कल्पनेतून या शाळा देशभरात होत आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०20 यातील सर्व तरतुदी या शाळांमध्ये राबविण्यात येत आहेत. देशभरात १५ हजाराहून अधिक शाळा या निर्माण होत आहेत. या शाळाला उत्कृष्ट पायाभूत सुविधा तसेच उत्तम मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात येत आहे. जालना जिल्ह्यामध्ये पहिल्या टप्प्यात १२ व दुसऱ्या टप्प्यात सहा अशा एकूण १८ शाळा पीएम श्री शाळा म्हणून तयार झाल्या आहेत. या शाळांमधील सर्व शिक्षकांना दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी प्रशिक्षण देण्यात आले आहे. तसेच शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रमांचे आयोजन करून त्यासाठी निधीही उपलब्ध करून देण्यात आला आहे. विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य, मुलांची सुरक्षितता, शाळेचा सुंदर परिसर, सुंदर पर्यावरण, स्वच्छ शाळा, प्लास्टिक मुक्त शाळा, विज्ञान प्रयोगशाळा, क्रीडा साहित्य अशा विविध योजना तयार करून त्या शाळांमध्ये राबविण्यात येत आहेत. या शाळा आपल्या तालुक्यातील आदर्श शाळांम्हणून उदयाला येत आहेत.

या शाळांमधील शिक्षकांसाठी आता दोन अभ्यास दौरा आयोजित करण्यात आला आहे. पहिल्या टप्प्यातील शिक्षकांसाठी राज्यांतर्गत



नागपूर चंद्रपूर वर्धा या जिल्ह्यांना भेट देण्यात आले असून दुसऱ्या टप्प्यातील शाळांच्या शिक्षकांसाठी राज्याबाहेर म्हणजे गुजरात राज्यात अहमदाबाद गांधीनगर बडोदा नर्मदा या जिल्ह्यातील उत्कृष्ट शैक्षणिक संस्था व पीएम श्री शाळांना भेटी देऊन तेथील चांगल्या बाबी आपल्या शाळांमध्ये राबविण्याच्या दृष्टीने हा अभ्यास दौरा होत आहे. गुजरात शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था गांधीनगर, बडोदा, विविध पी एम श्री शाळा अशा संस्थांना भेटी देऊन त्या संस्थांचे कार्य जाणून घेण्यासाठी अभ्यास दौरा होत आहे. या अभ्यास दौऱ्यात जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था जालनाचे वरिष्ठ आणि व्याख्याता डॉ. प्रमोद कुमावत यांच्यासह जिल्हा परिषद प्रशाला शहागड व जिल्हा परिषद प्रशाला धावडा या शाळेतील २२ शिक्षक मुख्याध्यापकांचा समावेश आहे

## जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यात आगामी गुढीपाडवा, रमजान ईद आणि श्रीरामनवमी या सण, उत्सवात शहरातील मिरवणुका व विविध कार्यक्रम आणि आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता राखण्यासाठी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) (३) अन्वये जालना जिल्ह्याच्या संपूर्ण हद्दीत दि.३ एप्रिल २०२५ पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी करण्यात आली आहे, असे आदेश अपर जिल्हादंडाधिकारी गणेश महाडिक यांनी जारी केले आहेत. संपूर्ण जालना जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश दि. २१ मार्च रोजी सकाळी ६ वाजेपासून ते दि. ३ एप्रिल २०२५ रोजीच्या २४ वाजेपर्यंत लागू राहील. या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत बाळगता येणार नाही. व्यक्तीचे प्रेते, आकृत्या व प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. जाहीरपणे घोषणा, गाणे म्हणणे, वाद्य वाजविणे यास प्रतिबंध राहील. तसेच कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास किंवा मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अधिकारी- कर्मचाऱ्यांना तसेच उपविभागातील पोलिस अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूका, सभा, मोर्चा यांना लागू राहणार नाही, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

## अंकित राठोडने लॅब मास्टर चॅम्पयनशिपमध्ये स्पर्धत सर्वप्रथम क्रमांक पटकावला

### १५ विद्यार्थ्यांनी सक्रीय सहभाग नोंदवला



**बदनापूर । प्रतिनिधी -** निर्मल क्रीडा व समाज प्रबोधन ट्रस्ट संचलित, इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, पाथ्रीकर कॅम्पस बदनापूर येथील बी फार्मसी द्वितीय वर्षाचा विद्यार्थी अंकित राठोड याने छत्रपती संभाजीनगर येथील श्रेयस फार्मसी महाविद्यालयाद्वारे आयोजीत लॅब मास्टर चॅम्पयनशिपमध्ये स्पर्धत सर्वप्रथम क्रमांक पटकावला. तसेच खालील अन्य १५ विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.
यात कार्तिक बिडे, कुणाल जाधव, भाऊसाहेब गोटे, युवराज जायभाये, राजश्री कांबळे, नेहा चव्हाण, वरद वाघ, सिद्धार्थ चाळगे, योगेश उर्कडे, सुशील गाडेकर, प्रदीप खरात,विजय शेळके,रोहिणी रत्ताटे,प्रतीक हांडके, अनिकेत रामदासी आदींना महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांचे अमूल्य मार्गदर्शन लाभले. मार्गदर्शक प्रा. अविनाश हटकर, प्रा.अर्शद अन्सारी, प्रा. वैशाली साळुंके, प्रा.कोमल जैस्वाल, प्रा.सौरभ बोंद्रे यांनी केले. या यशाबद्दल निर्मल क्रीडा व समाज प्रबोधन ट्रस्टचे अध्यक्ष प्रा.डॉ. देवेश पाथ्रीकर यांनी सर्व विद्यार्थ्यांचे तसेच इन्स्टिट्युट ऑफ फार्मसीचे प्रा. डॉ. सुनील जयभाये,कल्याण देवकत्ते, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांचे अभिनंदन केले आहे.

## पान १ वरुन

### दृष्टी ही जीवनाचा ...

येथील लॉयन्स नेत्र हॉस्पिटलमध्ये मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. नेत्रदोष आढळून आलेल्या रुग्णांना मार्गदर्शन करण्यात येऊन पुढील उपचाराबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या शिबिराला उस्फुर्त प्रतिसाद मिळाला.

### पंचदिवसीय श्रीपंचकृष्ण ...

सुजांनमुनी अकुंळनेरकर, प्रभाकर दादा आदी संत-महंतांची उपस्थिती होती. कार्यक्रमासाठी संपूर्ण जिल्ह्यातून महानुभावपंथीय भाविकांची मोठी उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी आंबेगाव येथील महानुभाव उपदेशी भक्तमंडळ व समस्त ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

चक्रधर स्वामींच्या विचारांची आजही गर महानुभव पंथाचे संस्थापक चक्रधर स्वामी यांच्या समतेवर आधारित विचारांची आजही संपूर्ण विश्वाला गरज आहे.

तेराव्या शतकात चक्रधर ३ स्वामींनी वैदिक धर्मपरंपरेला फाटा देत शूद्र आणि महिला सर्वांना मोक्षाचा समान अधिकार देत एकेश्वराचा पुरस्कार केला. त्यांच्या समतेच्या आणि ममतेच्या ३ विचाराची खऱ्या अर्थाने आजच्या अस्थिर जगाला गरज आहे, असे मत यावेळी महानुभाव पंथाचे लोणारकर बाबा यांनी व्यक्त केले.

### न्यायाधीश यशवंत वर्मा ...

अनु शिवरामन यांचा समावेश असलेली तीन सदस्यीय समिती स्थापन केली आहे.

ही समिती आपल्या चौकशीत दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायाधीश यशवंत वर्मा यांच्या घरात सापडलेली रोकड कुठून आली आणि तिचा स्त्रोत काय आहे याचा तपास करणार आहे.

याचबरोबर सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश संजीव खन्ना यांनी दिल्ली उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश डीके उपाध्याय यांना सध्या न्यायाधीश यशवंत वर्मा यांच्याकडे कोणत्याही खटल्याचे कामकाज देऊ नये असे निर्देश दिले आहेत.

१४ मार्च रोजीच्या आगीच्या घटनेत न्यायाधीश यशवंत वर्मा यांच्या दिल्लीतील तुघलक रस्त्यावरील निवासस्थानी बेहिशेबी रोख रकमेच्या कथित जप्तीबाबत दिल्ली उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांकडून अहवाल मिळाल्यानंतर सरन्यायाधीशांनी तीन सदस्सीय चौकशी समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला.

न्यायमूर्ती यशवंत वर्मा घरी सापडलेल्या रोख रक्कम प्रकरणात सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी एक मोठे पाऊल उचलले आहे. आता या प्रकरणाशी संबंधित दिल्ली उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांचा अहवाल सार्वजनिक केला जाणार आहे. न्यायमूर्ती वर्मा यांचे उत्तर देखील सार्वजनिक केले जाईल. या प्रकरणाशी संबंधित कागदपत्रे वेबसाइटवर देखील उपलब्ध असतील.

दिल्ली उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांनी सादर केलेला अहवाल, न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांचे उत्तर आणि इतर कागदपत्रे सर्वोच्च न्यायालयाच्या वेबसाइटवर अपलोड केली जात आहेत.

न्यायपालिकेची बाजू सर्वांसमोर मांडण्यासाठी, सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी सर्व नोंदी सार्वजनिक करण्याचा निर्णय घेतला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या इतिहासात प्रथमच सर्व नोंदी सार्वजनिक होणार आहेत.

१४ मार्च रोजी न्यायाधीश यशवंत वर्मा यांच्या सरकारी निवासस्थानातील स्टोअर रूममध्ये आग लागली होती. त्यावेळी न्यायमूर्ती वर्मा शहरात नव्हते. त्यानंतर त्याच्या कुटुंबाने अग्निशमन दल आणि पोलिसांना बोलावले. आग विझवल्यानंतर, पथकाने बंगल्याची तपासणी केली तेव्हा विविध खोल्यांमध्ये मोठ्या प्रमाणात रोख रक्कम आढळून आली होती.

हे प्रकरण समोर आल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी कॉलेजियमची बैठक बोलावली आणि न्यायाधीश यशवंत वर्मा यांची दिल्ली उच्च न्यायालयातून अलाहबाद उच्च न्यायालयात बदली केली. दरम्यान न्यायाधीश यशवंत वर्मा यांची ऑक्टोबर २०२१ मध्ये अलाहाबाद उच्च न्यायालयातून दिल्ली उच्च न्यायालयात बदली करण्यात आली होती.

### दूरसंचार सल्लागार समितीची बैठक संपन्न; बीएसएनएल सेवांसंबंधी महत्त्वपूर्ण निर्णय

# सरकारी कार्यालयात बीएसएनएल कनेक्शन सक्तीचे होणार?

**जालना । प्रतिनिधी** - जालना, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) आणि बुलढाणा जिल्ह्यांची दूरसंचार सल्लागार समिती बैठक पार पडली. या बैठकीत BSNL च्या सेवांबाबत विविध विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली. बीएसएनएल नेटवर्कची सद्यस्थिती, टॉवर उभारणी, टेंडर प्रक्रियेत झालेल्या त्रुटी आणि नॅशनल ऑप्टिकल फायबर नेटवर्क (NOFN) योजनेअंतर्गत झालेल्या कामांची पडताळणी यावर भर देण्यात आला.

बैठकीत मागील TC मिटिंग (फेब्रुवारी २०२४) च्या इतिवृत्ताची प्रत मागविण्यात आली, तसेच BSNL च्या कामकाजात आलेल्या अडचणींवर चर्चा झाली. ठेकेदाराने औरंगाबाद, जालना आणि बुलढाणा येथे तात्पुरत्या स्वरूपात केलेल्या कामांसाठी EPF, ESIC आणि इतर कायदेशीर बाबींची पूर्तता न केल्यामुळे BSNL ने बील थांबविले होते. परंतु नियमांचे उल्लंघन करत गुत्तेदारास चुकीच्या पद्धतीने बीले अदा करण्यांत आले. या संदर्भात तीन दिवसांत संपूर्ण अहवाल सादर करण्याचे निर्देश खा. डॉ. कल्याण काळे यांनी दिले.

तसेच, औरंगाबाद बीए अंतर्गत OFC टाकणे व दुरुस्तीवरील खर्चाची तपासणी करण्यास सांगण्यात आले. मागील तीन वर्षांत लॉसी फायबर, रिहॅबिलिटेशन आणि नवीन केबल टाकण्यासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च करण्यात आला.

जालन्यात NOFN प्रकल्पांतर्गत १३९ कोटी रुपये खर्च झाले, परंतु प्रत्यक्षात ही सेवा कार्यरत नाही. सध्या देखभाल आणि दुरुस्तीच्या नावाखाली फक्त बिलिंग केली जात आहे.

बैठकीत BSNL च्या नॅशनल ऑप्टिकल फायबर नेटवर्क (NOFN) योजनेवर सुद्धा चर्चा झाली. हा प्रकल्प देशातील २,५०,००० ग्राम पंचायतींना फायबर नेटवर्कने जोडण्यासाठी तयार करण्यात आला होता. तसेच १ एप्रिल २०२३ पासून मेंटेनन्ससाठी ५ कोटी रुपये खर्च करण्यात आले. मात्र, सध्या नेटवर्क कार्यरत नाही, त्यामुळे हा खर्च अनुत्पादक ठरला आहे.




या संदर्भात खालील प्रश्न उपस्थित करण्यात आले -

जालना जिल्ह्यात NOFN अंतर्गत किती ग्रामपंचायती जोडल्या गेल्या?, त्यापैकी किती ग्रामपंचायतींमध्ये सध्या नेटवर्क सुरू आहे?, या संपूर्ण प्रकल्पासाठी झालेला एकूण खर्च किती?, १ एप्रिल २०२३ पासून आजपर्यंत देखभाल-दुरुस्तीवर झालेला खर्च आणि त्याचा उपयोग काय?

बैठकीत हा विषय गंभीर मानला गेला आणि बीएसएनएल अधिकाऱ्यांना तातडीने अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

महत्त्वाचे निर्णय आणि पुढील कृती योजना - बीएसएनएल टॉवर अखंडित सुरू राहावे, जालना, (छत्रपती संभाजीनगर) औरंगाबाद व बुलडाणासाठी नविन टॉवरला मान्यता मिळालेली आहे. सदरहू टॉवरचे लवकरच काम सुरू होणार.

सरकारी कार्यालयांमध्ये बीएसएनएल कनेक्शन अनिवार्य करण्यासाठी राज्य सरकारकडे पत्र व्यवहार - सरकारी कार्यालयांमध्ये बीएसएनएल कनेक्शन सक्तीचे करण्यासाठी पुढाकार घेतला जाणार.

बीएसएनएलच्या विविध योजनांचा आढावा - ग्राहकांसाठी नवीन योजना आणि त्यांच्या अंमलबजावणीवर चर्चा करण्यात आली.

या बैठकीत बीएसएनएल सेवांच्या बळकटीसाठी महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. यामुळे नेटवर्क सुधारणे, ग्रामपंचायतींमध्ये NOFN प्रभावीपणे कार्यान्वित करणे.

## शिक्षकांना बीएलओच्या कामातून कार्यमुक्त - शेख अब्दुल रहीम

### मुख्यमंत्री, मुख्य निवडणूक अधिकारी यांना निवेदन

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** महाराष्ट्र राज्यात जिल्हास्तर/तालुकास्तरावर अनेक शिक्षकांना बीएलओ कामासाठी नियुक्ती देण्यात आलेली आहे. यामुळे कामाचा ताण वाढल्याने कालांतराने विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर परिणाम होऊ शकतो. नुकतेच शासनाने (शालेय शिक्षण विभागाने) २३/०८/२०२४ रोजी शासन निर्णय पारित करून शैक्षणिक व अशैक्षणिक कामाचे वर्गीकरण करून अशैक्षणिक कामे शिक्षकांना न देण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. बीएलओ कामकाज शैक्षणिक कामाचा भाग नाही. म्हणून शिक्षकांना अशैक्षणिक कामे देण्यात येऊ नये असे नमुद केलेले आहे. त्यामुळे शिक्षकांची बीएलओच्या कामातून मुक्तता करण्यात यावी अशा मागणीचे निवेदन पुन्हा सादर करण्यात आले. राज्याचे निवडणूक आयोगाचे मा.आयुक्त यांनाही याबाबत पत्र दिलेले होते त्यांनी ते आपल्याकडे वर्ग देखील केलेले होते. तसेच सद्या देशात लोकसभा व विधानसभा महाराष्ट्र अशा महत्त्वाच्या दोन निवडणूका संपलेल्या आहेत म्हणून शिक्षकांना इडज च्या कामातून कायमचे वगळण्यात यावे अशा मागणीचे निवेदन थेट मंत्रालय मुंबई येथे राज्याचे मा. मुख्य निवडणूक अधिकारी, मुंबई यांना देण्यात आले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना ही निवेदन देण्यात आले आहे. न्याय मिळेपर्यंत पाठपुरावा सुरुच ठेवणार असल्याचे शेख अब्दुल रहीम यांनी माध्यमांशी बोलतांना सांगितले.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.